FORM-1A

0068621

N.C.R.B.

I.I.F.-I

# पहिली खबर

# FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य State महाराष्ट्र, जिल्हा District मुंबई, पोलीस ठाणे Police Station लाप्रवि, पहिली खबर क्र. FIR No. ६०, वर्ष Year २०२३, दिनांक Date १५/१२/२३

2. (i) अधिनियम Act. भ्रष्टाचार प्रति. अधि. १९८८, कलमे Sections ७ (अ)
   (ii) अधिनियम Act ..., कलमे Sections ...
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ...

3. (a) अपराधाची घटना : वार Occurrence of offence : Day सोमवार, तारीख पासून Date from ११/१२/२३ वेळ Time ..., तारीख पर्यंत Date to १४/१२/२३ वेळ Time ...
   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion).
   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00
   (b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख Date ११/१२/२०२३, वेळ Time ...
   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. 04/23, तारीख Date १५/१२/२३ वेळ Time 04:25

4. माहितीचा प्रकार Type of Information : ..., लेखी / तोंडी Written / Oral ...

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा ..., चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. ...
   Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. Chouki / Beat / O.P. Name and No.
   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name पी/उत्तर विभाग मनपा कार्यालय मालाड, मुंबई चे कॅन्टीन, ठिकाणाचे नंबर No. if any ..., गल्ली Ward ..., रस्त्याचे नाव Name of road ...
   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place ..., गाव Village ..., पोस्ट Post ..., तालुका Taluka ..., जिल्हा Dist. ..., राज्य State ...
   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव : In case, outside the limit of this Police Station ..., तालुका Taluka ..., जिल्हा Dist. ..., राज्य State ...

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
   (a) नाव Name इजाज खान (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name नियाज खान
   (c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age ५१ वर्षे (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय फोन नं. Phone No. ९३०२८१४०५०
   (e) पारपत्र क्रमांक Passport No. ..., दिल्याचा दिनांक Date of Issue ..., दिल्याचे ठिकाण Place of Issue ... (f) व्यवसाय Occupation टॅक्सी चालक
   (g) धर्म Religion मुस्लिम, जात Caste ..., जनजात Sub-Caste ...
   (h) पत्ता Address : गल्ली / सर्व्हे नं. Ward, घर / नाव नं. House/Name No., फोन / मो. नं. Phone/M. No., पॅन नं. PAN No., वोटर्स नं. Card No.
   रुम नं. १२१६, MHB कालनी चाळ ह १४९, मालाड मुंबई ४०००६५
   रस्त्याचे नाव Road ..., जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place ..., गाव Village ..., पोस्ट Post ..., पो. स्टे. P. Stn. ...
   तालुका Taluka ..., जिल्हा Dist. मुंबई, राज्य State महाराष्ट्र, सध्याचा पत्ता Present Address ...

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
   Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

आरोपी खाजगी इसम मोहन गंगादिन मानेकर, ५४ वर्षे, धंदा- खाजगी लायसन्स क्लबर, रा. ठि. ए/१/४०१, स्वप्नकिरण बिल्डिंग, पिंपरीपाडा, मालाड पूर्व, मुंबई ४०००९७

Y.P.P.-3,200 Bk.-(25×6=150 Lvs)-3-2021-PA3-(K) 347

8. तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे तात्काळ

Reasons for delay in reporting by the complainant/informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य रु. १०,०००/- (रु. ५००/- दराच्या भारतीय चलनातील २० नोटा)

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक

Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

यातील नमूद तारीख, वेळी व ठिकाणी अटक आरोपीताने फि. यांना पाणी कनेक्शन देण्याकरीता लोकसेवक यांचेकडून फि परवाना काढून देतो असे सांगून लोकसेवकाने सार्वजनिक कर्तव्य करण्यापासून परावृत्त राहण्यासाठी भ्रष्ट मार्गाने आपल्या वैयक्तिक प्रभावाचा वापर करून लोकसेवकास प्रलोभित करण्यासाठी फि. कडून गैरफायद्याकरीता रु. २०,०००/- लाचेची मागणी करून तडजोडीअंती रु. १०,०००/- रकमेची लाच स्विकारली म्हणून गुरक ४०/२३ कलम ७(अ) भ्र.प्र. अधि १९८८ अन्वये गुन्हा नोंद.

13. केलेली कार्यवाही – 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ……, जिल्हा ……, राज्य ……

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.)……… Rank……… No……… to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to……… (3) Transferred to P. S. ……… District……… on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/ informant, free of cost.

(R.O.A.C.)

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer in-charge, Police Station
संपूर्ण नाव Name रविंद्र ……
पदनाम Rank सहायक पोलीस आयुक्त
तपासिक अं. चा कोड क्र. लाप्रवि, मुंबई
Posting
Code No. of I. O. ………

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression
of the Complainant / Informant.

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख………
1. Date and time of submitted to the Court.

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.

Copy to 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of **First Information Report**

यातील तक्रारदार नामे इजाज नियाज खान, ५१ वर्षे, यांच्या दि. /१२/२३ रोजी स्वतंत्र पानावर संगणकावर टंकलिखित केलेला जबाब हाच नमूद गुन्ह्याच्या प्रथम खबरी अहवाल म्हणून संबोधण्यात येत आहे.

सदरहू,

(रविंद्र बाबर)
सहाय्यक पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

फिर्याद दि. १५/१२/२०२३

श्री. इजाज नियाज खान, वय ५१ वर्ष, धंदा– टॅक्सी चालक, रा.ठि. रूम नं.१३१६, एम.एच.बी. कॉलनी, चाळ क्र.१४९, मालाड, मुंबई ४०००९५. मो.क्र. ९३७२८१४०५०.

मी वरीलप्रमाणे असुन उपरोक्त नमुद पत्त्यावर माझे पत्नी व मुलासह रहावयास आहे. मी टॅक्सी चालविण्याचा व्यवसाय करत असुन त्यातुन मिळणारे उत्पन्नावर माझा उदरनिर्वाह करीत आहे.

मी रहात असलेल्या एम.एच.बी. कॉलनी, मालाड, मुंबई ४०००९५ परिसरात पाण्याची आवश्यकता असल्याने मी व माझे परिसरातील राहणारे साजीद एस. कुरशी, इब्राहीम एच.एम.ए.खान, मुस्ताक आय. ेख, अमीर एफ. पटेल असे सर्वांनी मिळुन पाण्याचे नवीन कनेक्शन मिळण्याकरीता बृहन्मुंबई महानगरपालिका, पी उत्तर विभाग, मालाड पश्चिम मुंबई येथे दि. ०७/१२/२०२३ रोजी लायसन्स धारक श्री. मोहन मानेकर याचे लायसन्स क्र. PL No.2097 यांच्यामार्फत अर्ज केला होता. सदर अर्जाच्या अनुषंगाने मी दि. ०८/१२/२०२३ रोजी बृहन्मुंबई महानगरपालिका, पी उत्तर विभाग, मालाड पश्चिम मुंबई येथे जावून डिसपॅच विभागातुन माझी नावाची फाईल मागुन घेतली व संबंधीत अधिकारी यांची भेट घेवुन विहीत नमुन्यातील अर्जावर संबंधीत विभागातील अधिकारी यांचा स्टॅम्प मारुन स्वाक्षऱ्या घेतल्या. त्यानंतर कॅश सेक्शन विभागात जावुन रु. ८८०/–भरले व पावती घेतली.

त्यानंतर दि. ११/१२/२०२३ रोजी मी पी उत्तर विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई येथे जावून माझी फाईल दाखविली असता. माझी फाईल संगणकावर APPN/2315/WW. DT 11 DEC 2023 अशी नोंदविण्यात आली. त्यानंतर संबंधित क्लार्क ने मला माझे फाईलवर लायसन्स धारकाची स्वाक्षरी घेण्यास सांगीतले. त्याकरीता मी माझे ओळखिचे प्लंबर श्री. मोहन मानेकर यांना भेटलो असता त्यांनी मला माझे फाईलवर स्वाक्षरी होऊन ती मान्यतेकरीता पाठविणेसाठी बी.एम.सी. कार्यालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांना रू. ३०००/– द्यावे लागतील असे सांगून बेकायदेशीर मार्गाने संबंधीत अधिकाऱ्यांकरीता लाचेची मागणी केली.

मला श्री.मोहन मानेकर यांचेमार्फतीने पी उत्तर विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई संबंधित अधिकाऱ्यांना लाच देण्याची ईच्छा नसल्याने मी त्यांचेविरूध्द दि. ११/१२/२०२३ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी मुंबई कार्यालयात येवून तेथील वरिष्ठ अधिकारी यांना भेटुन माझी तक्रार सांगितली. त्याप्रमाणे त्यांनी माझे तक्रारीवर पुढील कार्यवाही करण्याकरीता तपासी अधिकारी म्हणून स.पो.आ. बाबर व पर्यवेक्षक अधिकारी म्हणून पा.नि. म्हात्रे यांची नेमणुक करून पुढील कारवाई केली व मला लिहीता येत नसल्याने माझी तक्रार नेमण्यात आलेल्या पंचाच्या सहाय्याने माझे सांगण्यानुसार लिहून घेतली.

मी केलेल्या तक्रारीनुसार दि. १२/१२/२०२३ रोजी मी, पोलीस पथक व शासकीय पंचासह पी उत्तर विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई येथे जावून पडताळणी केली असता खाजगी इसम मोहन मानेकर यांनी माझेकडे पी उत्तर विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई येथील संबंधित अधिकारी यांचेकरीता रू. ३०००/–ऐवजी रू. २०,०००/– लाचेची मागणी करून प्रत्येक अधिकांऱ्यास रु. ३,०००/– दयावे लागतील असे सांगुन तडजोडी अंती रू. १०,०००/– स्विकारण्याचे कबूल केले. तसेच कोणत्याही अधिकाऱ्यास भेटु नको व तुझा पी परवाना मी काढुन देतो असे सागितले. त्यानुसार सदरची लाचेची रक्कम जमा करणेकरीता मी श्री. मानेकर यांचेकडे काही अवधी मागून घेतला. माझे व श्री मानेकर यांचेमध्ये झालेले संभाषण तपासी अधिकारी सपोआ बाबर यांनी त्यांचेकडील डिव्हीआर मशीनव्दारे मायक्रो एस.डी. कार्डमध्ये ध्वनीमुद्रित करून घेतलेले आहे. त्यानंतर सपोआ बाबर यांनी मला लाचेच्या रक्कमेची सोय करून त्यांना संपर्क करण्यास सांगितले.

त्यानुसार लाचेच्या रकमेची सोय झाल्यानंतर मी सपोआ बाबर यांना संपर्क केला असता त्यांनी मला दि. १४/१२/२०२३ रोजी सकाळी १०:३० वाजता लाप्रवि कार्यालयात बोलाविल्यानुसार मी लाप्रवि कार्यालयात हजर झालो. त्यापुढील कार्यवाही करून मी, शासकीय पंच व सापळा पथक असे लाप्रवि कार्यालयातून आरे कॉलनीच्या दिशेने रवाना झालो. आम्ही आरे कॉलनी येथे पोहोचल्यानंतर सपोआ बाबर यांनी मला श्री. मानेकर यांना फोन करून भेटण्याची वेळ घेण्याच्या सुचना दिल्या. त्यानुसार मी श्री. मोहन मानेकर यांना फोन करून माझे मोबाईलचा स्पिकर ऑन केला व त्यांचेशी बोलणे केले असता. श्री मानेकर यांनी मला लाचेच्या रकमेसह १६:०० वाजता पी उत्तर विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई कार्यालयातील कॅन्टीनमध्ये भेटण्यास सांगीतले. सदरचे संभाषण तपासी अधिकारी सपोआ बाबर यांनी त्यांचेकडील डिव्हीआर मशीनव्दारे मायक्रो एस.डी. कार्डमध्ये ध्वनीमुद्रित करून घेतलेले आहे.

त्यानंतर सपोआ बाबर व पोनि म्हात्रे यांनी मला, पंच व पोलीस पथकास सापळा कारवाईच्या दृष्टीने घ्यावयाच्या खबरदारीच्या सुचना दिल्या व लाचेच्या रकमेस अॅन्थ्रासीन पावडर लावून माझे ताब्यात दिली व माझे शर्टच्या आतील बनियानला डिव्हीआर मशीन लावून चालू केली. त्यानंतर मी, पोलीस पथक व पंच असे पी उत्तर विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, मालाड, मुंबई येथे जाण्याकरीता रवाना झालो. त्यांनतर मी पी उत्तर विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई येथील कॅन्टीने मध्ये जावून श्री मानेकर यांची भेट घेतली. त्यावेळी त्यांनी मी झेराक्स काढुन येतो तुम्ही कॅन्टीगमध्ये बसा असे सागितले. त्यांनतर त्यांनी मला, **'हां पैसा देना पडेगा, पैसा देना पडेगा...प्रोसीजर अभी चालू करना है...तुम्हारे नाम से पेपर होगे ना...फास्ट होगा तो फास्ट करेंगे...दस दो...दस दस हजार'** असे बोलून माझेकडे लाचेच्या रकमेची मागणी केली. त्यानुसार मी त्यांना माझे ताब्यातील अॅन्थ्रासीन पावडर लावलेली रू. १०,०००/— लाचेची रक्कम दिली. सदर रक्कम श्री. मानेकर यांनी मोजून घेतली असता कॅन्टीन मध्ये दबा धरून बसलेले पोलीस पथकाने श्री मानेकर यांना रंगेहाथ ताब्यात घेतले. सदरवेळी आमचेमधील संभाषण मला लावण्यात आलेल्या डिव्हीआर मधील मायक्रो एसडी कार्डमध्ये ध्वनीमुद्रित झालेले आहे.

श्री मानेकर यांना ताब्यात घेवून लाप्रवि मुंबई कार्यालयास पुढील कारवाईकरीता रवाना होत असलेबाबची नोंद मालाड पोलीस ठाणे, मुंबई येथे घेवून आम्ही पुढील कारवाईकरीता शासकीय वाहनाने लाप्रवि, वरळी, मुंबई कार्यालयास आलो.

तरी खाजगी इसम मोहन गंगादिन मानेकर, ५४ वर्षे, रा.ठि. ए/१/४०१, स्वप्नकिरण बिल्डींग, पिंपरी पाडा, मालाड पुर्व, मुंबई ४०००९७ यांनी माझेकडे पाणी कनेक्शन देण्याकरीता पी उत्तर विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई येथील लोकसेवक यांचेकडून पी परवाना काढून देतो असे सांगून लोकसेवकाने सार्वजनिक कर्तव्य करण्यापासून परावृत्त राहण्यासाठी भ्रष्ट मार्गाने आपल्या वैयक्तिक प्रभावाचा वापर करून लोकसेवकास प्रलोभित करण्यासाठी माझेकडून गैरफायदयाकरीता रू. २००००/— लाचेची मागणी करून तडजोडीअंती रू. १००००/— रकमेची लाच स्विकारली म्हणून माझी सदर खाजगी इसमाविरूध्द कायदेशीर तक्रार आहे.

माझा वरील जबाब मराठीत लॅपटॉपवर टंकलिखीत केला असून तो मला मराठीतुन वाचून हिंदीतून समजावुन सांगितला असता तो माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरा आहे.

समक्ष,

( रविंद्र बाबर ),
सहाय्यक पोलीस आयुक्त,
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

15/12/2023